*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

**NAVJYOT / Vol. XII / Issue - II** **ISSN 2277- 8063**

# स्त्रीवादी चळवळ

**सौ. प्रियांका विलास झोळे-पाटील,** राज्यशास्त्र विभाग, पी.एच.डी. स्टुडंट
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड. अभ्यासकेंद्र - पिपल्स कॉलेज, नांदेड.
adv.zpriya7702@gmail.com

---

**प्रस्तावना -**

स्त्रीवादी सिद्धांकन हे स्त्रीवादामधील महत्त्वाच्या मांडणीचे सिद्धांतीक स्वरूप आहे. लिंगभाव आधारीत केली जाणारी विषमता समजून घेवून त्याचे विश्लेषण करणे हे उद्दीष्ट असते. बदलत्या काळानुसार झालेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संदर्भातील बदलांच्या अनुषंगाने स्त्रीवादी सिद्धांकनामध्ये देखील बदल झालेले दिसून येतात. स्त्रीवादी सिद्धांतामध्ये असमानता समजावून घेत असताना स्त्रियांची सामाजिक भूमिका व त्यांना त्या भूमिका जगत असताना अनुभवाचे परिक्षण करणे आवश्यक आहे. स्त्रीवादी सिद्धांत मांडत असताना विचारवंतांनी कायदा, मालमत्ता, स्त्रीयांचा राजकीय सहभाग, महिलांचे हक्क, स्त्रीयांचे कौटुंबिक हिंसाचार, लैगिंक अत्याचार या संदर्भात संरक्षणाची सुद्धा मागणी केली आहे. स्त्री ही जगाच्या पाठीवर कायम शोषीत, उपेक्षित, वंचित असणारी समाजाचा घटक आहे. त्याचबरोबर स्त्रीची अवहेलना झाली आणि आजही मोठ्या प्रमाणात होत आहे. स्त्रीला तिचे हक्क मिळावे, तिच्या अस्तित्वाचा व अस्मितेचा विचार व्हावा, तिला सन्मान मिळावा यासाठी स्त्रीवादी चळवळ उदयाला आली.

**शोधनिबंधसार -**

स्त्रीवाद म्हणजे काय? तर या प्रश्नाचे उत्तर अतिशय मार्मिक आणि व्यापक स्वरूपाचे आहे. समाजामध्ये स्त्रीवाद या संकल्पनेचा गांभिर्याने विचार करण्याची गरज आहे. खाजगी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर होणाऱ्या स्त्रीयांच्या अन्यायाबद्दल जाणीव करणे त्याचबरोबर स्त्रियांवर होणाऱ्या हुकूमशाही विरोधात झगडण्याची तयार असणे म्हणजेच स्त्रीवादी शब्दाचा अर्थ काटेकोर पद्धतीने लावला तर स्त्रीवादी चळवळीने समाजाच्या मूलभूत परिवर्तनाची कास धरली पाहिजे आणि खाजगी, सामाजिक, राजकिय, आर्थिक अश्या सर्व पातळयांवर असणाऱ्या पुरूष प्रधानतेला बाजूला सारून संरचनात्मक बदलासाठी पावले उचलणे या सामाजिक रचनांची स्त्रीवादी मुल्यांनुसार नवीन बांधणी करणे आणि खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरण राबविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्त्रीवादी चळवळीच्या माध्यमातून आपले विचार व भूमिका यात परिवर्तन केले आहे. आता गरज आहे पुरूषांनी आपल्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याची त्यासाठी स्त्रीवादी चळवळ जन्माला आली आहे. त्या अनुशंगाने स्त्रीवाद चळवळ स्त्रीवादी चळवळीचा सिद्धांताची मांडणी या शोधनिबंधामध्ये करण्यात आली आहे.

**अभ्यासाचा उद्देश -**

1. स्त्रीवादी चळवळीची संकल्पना व स्वरूप यांचा आढावा घेणे.
2. स्त्रीवादी चळवळीची प्रेरणा व स्त्रीवादाच्या साहित्यीक परपंरा समजून घेणे.
3. स्त्रीवाद ही एक मानवमुक्तीची चळवळ आहे आणि या चळवळीला सामाजिक सुधारणेची गजी कश्याप्रकारे मिळाली हे जाणून घेणे.
4. स्त्रीवादी चळवळ, स्त्रीच्या मुक्तीचा लढा, स्त्री - पुरूष समानता आणि स्त्रीयांचे स्वतंत्र अस्तित्व याबाबतची धोरणे अभ्यासणे.
5. स्त्रीचा सन्मान तसेच स्त्री विषयक सुधारणा यामध्ये पुरूष सुधारकांनी पुढाकार घेतला त्या थोर पुरूषांबद्दल जाणून घेणे.
6. स्त्रीवादाची सैद्धन्तिक मांडणी, स्त्रीवादी चळवळ आणि साहित्य याचा समावेश या शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुतचे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी द्वितीय तरय संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी स्त्रीवाद चळवळीवर आधारीत पुस्तके, शोधनिबंध, स्त्रीवादी साहित्य याचा आधार घेतलेला आहे.

**स्त्रीवादी चळवळीची संकल्पना व स्वरूप -**

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीयांचे राजकीय आणि वैधानिक कायदेशीर हक्क, समान संधी, समान स्थान, गर्भपात, कुटुंब नियोजन इ. बाबतीत स्वनिर्णयाचा अधिकार, स्वत:च्या शरीरावर स्वत:चा अधिकार इत्यादीसाठी झालेल्या व होत असलेल्या चळवळींचाही समावेश स्त्रीवादाच्या व्याख्येत होतो. - शारदा साठे

याचाच अर्थ स्त्रीवाद ही एक संकल्पना आहे. स्त्रीयांच्या चळवळीचा संदर्भ आणि त्यातील वैचारिक केंद्र म्हणजे स्त्रीवाद होय. पुरूष प्रधान संस्कृतीला आळा घालणे आणि स्त्री-पुरूष समानता अस्तित्वात आणणे, स्त्रीयांचे संरक्षण आत्मसन्मान याबाबत धोरणे निश्चित करून स्त्री चळवळीला नवी दिशा देणे.

**स्त्रीवाद - मानवमुक्तीची चळवळ आणि सामाजिक सुधारणा -**

स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध घालणे, स्त्रीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांच्यात स्वनिर्णयाची ताकद आहे. शिक्षणाचा हक्क, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, समानतेचा अधिकार आणि स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. याबाबत स्त्रीवादी चळवळीने आपले पाऊल उचलले. स्त्रीवादी चळवळ ही पुरूषविरोधी चळवळ ही नाही तर शारदा साठे यांनी स्त्रीवादी चळवळीचा अर्थ 'स्त्रीवाद सर्वांग परिपूर्ण तत्वज्ञान नव्हे' या लेखात सांगताना म्हणतात, "स्त्रीवादी चळवळ म्हणजे मानवमुक्तीच्या चळवळीतील तो एक प्रवाह आहे. तो बाजूला काढता येत नाही. शरीरात जसे रक्त तशी स्त्रीवादी चळवळ आहे."

**स्त्रीच्या स्वातंत्र्याचा लढा -**

पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक या सर्वच बाबतीत दुय्यम स्थान दिले आहे. स्त्रीचे शारीरीक शोषण करणे, मानसिक त्रास देणे, लिंगभेद करणे, गुलाम बनविणे, चुल आणि मुल अशा गोष्टी स्त्रीवर लादून जबाबदारीतून सुटका करून घेणे, धर्माच्या नावावर स्त्रीचे शोषण करणे, स्त्री फक्त उपभोगाची वस्तू म्हणून तिच्याकडे पाहणे या सर्व बाबींमुळे स्त्रीला मुक्ती मिळाली नाही. तिच्यात आत्मविश्वास, धैर्य निर्माण झाले नाही. ती अविकसित, चार भिंतीच्या आत राहिली, तिला स्वातंत्र मिळावे, हा स्त्री मुक्तीचा लढा म्हणजे विचार आणि अंमल / कृती यांचा संगम आहे. स्त्रीला तीच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठीच स्त्रीवादी चळवळ उभारण्यात आली आहे.

**स्त्री - पुरूष समानता आणि स्त्रीवादी चळवळ -**

भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास केल्यास दिसून येते की, स्त्री-पुरूष हा भेद करून स्त्रीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जात नाहीत. भृणहत्या करून तिचे अस्तित्वच नष्ट केले जात आहे. तिच्यावर ना ना प्रकारचे अत्याचार करून तिला मारून टाकले जाते, आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते. मात्र स्त्रीवादी चळवळ स्त्री जन्माचे आदराने स्वागत करते, तिच्या सर्वांगीण विकासावर भर देते, समान हक्क, स्वातंत्र, शिक्षणाचा अधिकार, समान संधी, आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वत:च्या मालकीचे घर, राजकारण, सामाजिक, आर्थिक तसेच उच्च अधिकारी पदी स्त्रीची नेमणूक, कौटुंबिक न्यायव्यवस्था यांत स्त्रीला समान अधिकार देण्यासाठी स्त्रीवादी चळवळ हिरिरीने पुढाकार घेते. या चळवळीमध्ये सावित्रीबाई फुले, रमाबाई राठोड, ताराबाई शिंदे, पंडित रमाबाई, आनंदीबाई जोशी, काशिबाई कनिटकर यांचा मोलाचा वाटा आहे.

**स्त्रीवाद चळवळीत पुरूष सुधारकांचा पुढाकार -**

महात्मा फुले यांनी जातीव्यवस्था, पितृसत्ताक समाज व शिक्षण यांना महत्व देवून, उच्चवर्णीय समाजातील स्त्रीयांच्या बरोबरीने शुद्र, अतिशुद्र व समाजातील तळागाळातील स्त्रीयांचे प्रश्नही त्यांनी हाताळले. कुटुंब व विवाहसंस्थेच्या पितृसत्ताक समाजाच्या माध्यमातून स्त्रियांवर जे अन्याय होतात ते त्यांनी आपल्या विचारांच्या माध्यमातून परखडपणे मांडले. रमाबाई राठोड आणि ताराबाई शिंदे यांनी लिहीलेल्या स्त्री-पुरूष तुलना याला स्त्री प्रश्नांच्या बाबतीत मोल आहे. तसेच महात्मा फुले यांनी स्त्री प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. फुले यांच्या स्त्री

शोषणाचे स्त्रोत लक्षात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनानिर्मिती करीत असताना स्त्री-पुरूष समानतेच्या दृष्टीने घटनात्मक तरतुदी केल्या.

महात्मा गांधीजींनी स्त्री आणि पुरूष एकमेकांबरोबर सख्याच्या तुल्य भूमिकेवर राहू शकतात हे सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी स्त्रीचे मानवत्व गौण आणि हीन राहील असे आपले मत व्यक्त केले.

**सारांश -**

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीची आत्मसन्मान, अस्तित्व आणि तिच्या जीवनावर टाकलेला दृष्टीक्षेप आहे. स्त्रीवाद ही एक जाणीव आहे. स्त्रीवाद स्त्रीचा स्वाभिमान आणि अभिमान आहे. स्त्री ही सबला आहे, तीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे. समाजात तिचे स्थान उच्च आहे असा सैद्धांतीक दृष्टीकोन आहे. त्यामुळे स्त्री-पुरूष स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व समाजसुधारकांनी व विचारवंतांनी केलेला विचार आणि रचना म्हणजे स्त्रीवाद. पुरूष चळवळ नाहीशी व्हावी असा कोणताही दृष्टीकोन स्त्रीवाद ठेवत नाही. स्त्रीवाद स्त्रीला एक स्वतंत्र माणूस, नागरिक म्हणून, स्वत:च मत मांडण्याचा किंवा स्वाभिमानाने जगण्याचा हक्क मिळावा यासाठी तटस्थ भूमिका घेते. स्त्रीला तिचे हक्क, न्याय मिळावा, दुय्यमत्वातून तिची मुक्तता व्हावी, माणूस म्हणून तिला वागणूक मिळावी यासाठी अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना करण्यात आली. स्त्रीयांच्या विकासाकडे पाऊल टाकत 8 मार्च 1904 पासून हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो.

**संदर्भ -**

1. स्त्रीवादी चळवळ - राज्यशास्त्रातील आधुनिक संकल्पना
2. स्त्रीवादी चळवळ दिशा आणि दशा - प्रा. गायत्री गाडेकर
3. स्त्रीवादी साहित्य
4. दी सेकंड वेव्ह : ए रीडर इन फेमिनिस्ट थेअरी
5. सेपरेट रोड्स टू फेमिनिझम - बेनिता रोय
6. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळी संघटना